पुणे, गुरुवार, ५ जानेवारी २०२३ WWW.LOKSATTA.COM

लोकसत्ता

७५ अमृत महोत्सव

# ‘रयत’चा ‘आयबीएम’शी करार; विद्यार्थ्यांना नोकरीची हमी - पवार

**लोकसत्ता वार्ताहर**

**वाई :** रयत देशातील सर्वात महत्त्वाची संस्था असून जगातील बदलांची नोंद घेत संस्था आता वेगळ्या वळणावर आली आहे. जगातील सर्वात मोठी कंपनी असलेल्या आयबीएमशी करार करून कृत्रिम बुद्धिमत्ता. ( आर्टीफिशियल इंटेलिजन्स ) ज्ञान घेण्याची सुविधा उपलब्ध करणार आहे. हा विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीची हमी दिली जाईल, अशी ग्वाही रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी दिली.

सातारा जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात खासदार शरद पवार यांच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त तसेच रयत शिक्षण संस्थेतील ५० वर्षांच्या सक्रिय योगदानाबद्दल अभीष्टचिंतन आणि कृतज्ञता सोहळ्यात ते बोलत होते. या वेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.रघुनाथ माशेलकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी खासदार श्रीनिवास पाटील होते.



या वेळी सिम्बायोसिसचे डॉ. शां. ब. मुजुमदार, खासदार श्रीनिवास पाटील, माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर, दिलीप वळसे पाटील, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, उपाध्यक्ष ॲड. भगीरथ शिंदे, सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव, प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, प्राचार्य राजेंद्र साळुंखे, आमदार बाळासाहेब पाटील, मकरंद पाटील, शशिकांत शिंदे, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

पवार म्हणाले, की कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सर्वांपर्यंत शिक्षण पोचविण्याचे कार्य केले. सर्वसामान्यांपर्यंत शिक्षण पोचविले. रयत देशातील सर्वात महत्त्वाची संस्था आहे. आता रयत वेगळ्या वळणावर आहे. डॉ. अनिल पाटील यांनी खांद्यावर जबाबदारी घेऊन प्रारंभ केला आहे. जगातील बदलांची नोंद घेऊन त्याप्रमाणे शिक्षण देण्याची आज आवश्यकता आहे. त्यासाठी आम्ही जगातील सर्वात मोठी कंपनी आयबीएमसोबत कृत्रिम बुद्धिमत्तेचे ज्ञान देण्याची सुविधा उपलब्ध करणार आहोत. त्यासाठी त्या कंपनीशी करार होणार आहे. जे विद्यार्थी दहावी, बारावी तसेच पदवीधर होत असताना त्यांनी हा विषयही घ्यावा, अशा विद्यार्थ्यांना नोकरीची हमी दिली जाणार आहे. कर्मवीरांनी संस्था सुरू केली तेव्हा शिक्षित आणि अशिक्षित अशी स्थिती होती. आता परिस्थिती वेगळी आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैचारिक दृष्टिकोन वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**माझ्या जीवनात साताऱ्याला विशेष स्थान आहे. कारण माझं कुटुंब मूळचे साताऱ्याचे असून काही कारणास्तव आम्हाला बारामतीला जावे लागले. आम्ही तेथेच स्थायिक झालो. कोरेगाव तालुक्यातील आमचे गाव आहे. ज्या वेळी मी राजकारणात जाण्याचा निर्णय घेतला, त्या वेळी राजकीय क्षेत्राच्या सुरुवातीच्या काळात यशवंतराव चव्हाण हेच आमचे आदर्श होते.**

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.